दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९१/२०२२

**CNR – MHRG140011582022**

**सुमित्रा अर्जुन ठाकूर वैगैरे**

**विरुध्द**

**कोणीही नाही**

**निशाणी क्रमांक १ वरील आदेश**

१. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज न्यायालयांनी मालमत्तेच्या वारसांना मृत्युपत्र, व्यवस्थापकांना आणि प्रबंधकांना यथानियम मान्यता देण्याबाबत आणि प्रबंधकांची व व्यवस्थापकांची नेमणूक करण्यासंबंधी तरतुद करण्याबाबत विनियम (बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७) मधील कलम २ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे;**

अर्जदार हे अर्जामध्ये नमूद पत्त्यावरील रहिवासी असून, अर्जदार क्र. १ ची जाउ, अर्जदार क्र २ ते ४ यांची काकी, अर्जदार क्र ५/१ ही आजे सासू , अर्जदार क्र. ५/२ व ५/३ यांची पंणजी मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर याचे निधन दि. ०१/०८/१९८३ रोजी झाले असून त्यांच्या मृत्युदाखल्याची प्रमाणित प्रत निशाणी १२ कडे दाखल आहे. तसेच मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर यांचे वडील मयत मोतीराम बाळया ठाकुर यांचे निधन दिनांक १५/०८/१९७५ रोजी झाले असून त्यांच्या

मृत्यूदाखल्याची प्रामाणित प्रत निशाणी १३ कडे दाखल आहे. तसेच मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर यांचे दीर मयत अर्जुन वाघाजी ठाकुर यांचे निधन दिनांक ०२/१०/१९७३ रोजी झाले असून त्यांच्या मृत्यूदाखल्याची प्रामाणित प्रत निशाणी १४ कडे दाखल आहे. तसेच मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर यांचे दीराचा मुलगा मयत ध्रुव अर्जुन ठाकुर यांचे निधन दिनांक ९/०१/२०१८ रोजी झाले असून त्यांच्या मृत्यूदाखल्याची प्रामाणित प्रत निशाणी १५ कडे दाखल आहे.

**३.** अर्जदारांच्या कथनाप्रमाणे मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर यांची खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन – मौजे –जसखार, ता.उरण, जि.रायगड**

| **अनु. क्र.** | **मौजे** | **युनिट केस नं** | **सर्व्हे नं.** | **हिस्सा क्र.** | क्षेत्र हे. आर . पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | जसखार | ११९ | १०५ | ४७ | ०-०१-५ |
| २ | | | १०८ | ४ | ०-०५-३ |
| ३ | | | १४३ | १३ | ०-०६-० |
| ४ | | | १३४ | ९ | ०-०८-३ |
| ५ | | | ११९ | १४ | ०-०३-३ |
| ६ | | | ११४ | १८ | ०-०३-० |
| ७ | | | ६५ | ६ | ०-१०-० |
| ८ | | | २१ | १८ | ०-०८-८ |
| ९ | | | ५३ | २ | ०-०१-५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | | | ४२ | ५ | ०-११-३ |
| ११ | | | १९५ | ३ | ०-११-० |
| १२ | | | ६२ | ५ | ०-०४-३ |
| १३ | | | २१ | ७ | ०-०५-३ |
| १४ | जसखार | ११९/५२३ | १७९ | ५ | ०-०६-८ |

**४.** अर्जदारांचे असे कथन आहे की, वर नमूद मिळकत ही मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर यांचे नावे आहे. उपरोक्त मिळकतीसंदर्भात मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर यांस मृत्युनंतर वरील अर्जदार हेच कायदेशीर वारसदार असल्याने तसा वारस दाखला मिळणेकरीता सदरचा अर्ज केला आहे.

**५.** अर्जदार श्री. अक्षय ध्रुव ठाकुर यांनी त्यांच्या व इतर अर्जदाराच्या कथनाचे पुष्टयर्थ निशाणी क्र.११ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. निशाणी १६ कडे जसखार युनिट केस नं ११९/५२३ च्या ॲवार्ड ची प्रामाणित प्रत, निशाणी १७ कडे जसखार युनिट केस नं ११९ च्या ॲवार्ड ची प्रामाणित प्रत, अर्जदारांचे निशाणी क्र. १८ व २४ कडे आधारकार्डाची प्रामाणित प्रत, तसेच अर्जदाराच्या रेशनकार्डाच्या प्रमाणित प्रत निशाणी क्र. २५ ते २८ कडे दाखल केली आहे.

६. सदर प्रकरणात दिनांक ०४/११/२०२२ रोजीच्या दैनिक 'वादळवारा' मध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीस (निशाणी २९) आणि निशाणी ७ जाहीरनामा प्रसिध्द करुन अर्जदार यांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत हरकती

मागविण्यात आल्या होत्या. परंतु, जाहीर नोटीस ( २९) आणि जाहीरनामा (निशाणी ७) प्रसिध्द झालेनंतर अर्जदार यांच्या नावे वारसा दाखला देण्यासंदर्भात हरकत नोंदविली नाही.

**७.** अर्जदाराने दाखल केलेला शपथेवरील जबाब (निशाणी ११ ) व या प्रकरणातील कागदपत्रास कोणीही आक्षेप नोंदविला नसल्यामुळे, ती जशीच्या तशी शाबीत झालेली आहेत. अर्जदार यांची अर्जातील कथने व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर याचे अर्जदार क्र. १ ही जाउ, अर्जदार क्र २ व ४ ही पुतणे व पुतणी, अर्जदार क्र ५/१ ही नात सुन, अर्जदार क्र. ५/२ व ५/३ ही पणतू असल्याचे स्पष्ट होते. उपलब्ध कागदपत्रांवरुन व पुराव्यावरुन मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर यांचे अर्जदार हे हिंदू वारसा अधिनियमातील तरतूदीनुसार वर्ग–२ चे वारस असलेची बाब स्पष्ट झालेली आहे.

८. सबब, अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे अर्जदार हे जाउ, पुतणे, पुतणी, नात सून व पणतू या नात्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरत आहेत. त्यामुळे अर्जदार यांचे नांवे वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देणे योग्य व न्यायोचीत होणार आहे. सबब, अर्जदारांचा तोंडी व लेखी पुरावा याचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २. | अर्जदार क्र.१) श्रीमती. सुमित्रा अर्जुन ठाकुर, २) श्री. भास्कर अर्जुन ठाकुर, ३) श्री. आकाश अर्जुन ठाकुर,४) कु. अहिल्या अर्जुन ठाकुर, ५/१) श्रीमती. रेवती ध्रुव ठाकुर, ५/२) श्री. अक्षय ध्रुव ठाकुर,५/३) सौ. अक्षता केतन तांडेल पुर्वश्रमित कु. अक्षता ध्रुव ठाकुर, हे **मयत गुणाबाई मोतीराम ठाकुर** यांचे कायदेशीर वारस आहेत असा औपचारिक वारसा दाखला (Heirship Certificate) अर्जदार यांचे नावे देण्यात यावा. |
| ३. | अर्जदार यांचे नावे योग्य ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे. |

उरण (**पी.एन.पठाडे**)

दिनांक – १६/०२/२०२३ दुसरे सह दि. न्यायाधीश क.स्तर, उरण.